# वेस्टर्न तालावर 'मराठी' मुलगी



'मनीषा शहाणे' ही मराठी मुलगी आज अमेरिकेत 'वेस्टर्न म्युझिक' मध्ये उगवती तारका आहे. एका तासाच्या आमच्या गप्पांत ती आवर्जून मराठीच बोलत होती आणि प्रांजळपणे 'माझी मराठी शब्दसंपदा अत्यंत मर्यादित आहे' असे सांगून इंग्रजीत आपले विचार मोकळेपणाने मांडत होती. मनीषाचा जन्म 'Martinsville, VIRGINIA' मध्ये झाला. तिचे बाबा तबला वाजवतात तर आई अनौपचारीक कार्यक्रमांमध्ये (Indian gathering) आवर्जून गाणी म्हणत असे. मनीषावर अश्या वातावरणात संगीताचे संस्कार होणे साहजिकच होते. मनीषाने सहाव्या वर्षी 'My Favorite Things' ह गाणं पहिल्यांदा प्रेक्षकांसमोर सादर केलं. चौथीत असतांना तिला अचानक एका वर्षाकरिता भारतात राहायची संधी मिळाली. मुंबईच्या किंगजॉर्ज शाळेत शिकत असतांना तिच्या आत्याने तिला मराठी बोलायला, लिहायला आणि वाचायला शिकवले. आजीने तिची ओळख सप्तस्वरांशी करुन तर दिलीच पण अधिकाधिक चांगली मराठी - हिंदी गाणी ऐकवली. सुट्टीत आजीकडे (आईच्या आईकडे) इंदूरला गेली असतांना शेजारी राहणाऱ्या पूनमदिदिने मनीषाला असंख्य हिंदी गाणी ऐकवली आणि काही शिकवली सुध्दा. मनीषा आठवणीत हरवून जातांना म्हणते की, त्यावेळेच 'डफलीवाले, डफली बजा' (सरगम) गाणं हे माझं सगळ्यात आवडतं गाणं होतं'. अमेरिकेत परत गेल्यावर बाराव्या वर्षी मनीषाने 'वेस्टर्न क्लासिकल पियानो' शिकायला सुरुवात केली. त्याबरोबर तिने शाळेतल्या Choir मध्ये भाग घेतला. मनीषाचे पियानो आणि गायनाचे शिक्षण तेव्हा पासून सुरु झाले ते अजूनही चालूच आहे. सध्या ती नामांकित पियानोवादक आणि उस्ताद Charlie Banacos ह्यांच्याकडे (Master of Jazz theory & improvisation) शिक्षण घेते आहे. येथे तिच्या बरोबरीने अनेक व्यावसायिक गायक आणि वादक सुध्दा विद्यार्थी आहेत. मनीषाने आपले शिक्षण 'इकॉनोमिक्स' आणि 'इंटरनॅशल अफेर्स' मध्ये पूर्ण केले आहे. ह्या शिक्षणाचा उपयोग तिला विविध प्रकल्पांमध्ये तर झालाच पण त्या निमित्ताने ऑस्ट्रीया, हंगेरी, वॉशिंग्टन, सॅन फ्रान्सिस्को, सिंगापूर, मलेशिया, भारत, बॉस्टन अश्या ठिकाणी भ्रमंती करता आली. अमेरिकन संस्कृतीनुसार ती लवकरच स्वतःच्या पायावर उभी राहिली. शिक्षण आणि कामाच्या दरम्यान मनीषाने तितकेच लक्ष संगीतावर केंद्रीत केले होते.

मनीषासाठी संगीत हे तिला प्रगल्भ करणारं माध्यमं आहे तसेच जगभरातलं अभिव्यक्तीच माध्यम आहे. मनीषा ११ वर्षांची असल्यापासून कविता, गाणी लिहीते आहे. व्हर्जिनिया विद्यापीठात असतांना मनीषाने सोळा जणांच्या आ कपेला (a cappella) चमू साठी स्वतः गीत लिहीली आणि ती संगीतबध्दही केली. वॉशिंग्टनला असतांना मनीषा विविध ग्रुप्स बरोबर गात होती जसे की Accidentals, a co-ed a Cappella group, the All Souls, Unitarian Church Choir आणि रॉक बॅड Distraction. मनीषाने तिच्या स्वतंत्र्य करियरची सुरुवात तिने Green Island Café (Washington DC) येथून केली. न्यु इंग्लड मध्ये स्थलांतर केल्यानंतर काही काळ JackLee & Divercity व Black Sea Salsa बँड बरोबर गात होती. Cezanne cafe आणि Bakery येथे तिने स्वतः लिहिलेल्या आणि गायलेल्या कार्यक्रमाला प्रेक्षकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. २००३ साली तिला वाटायला लागले की आपण मोठ्या ग्रुपमध्ये गायला पाहिजे आणि ती ग्रॅमी नामांकन प्राप्त Chorus pro Musica ग्रुप मध्ये दाखल झाली व अनेक प्रतिष्ठीत ठिकाणी कार्यक्रम सादर केले. मनीषाने 'पुस्तकांवर' आणि पुस्तकांसोबत अनोखे कार्यक्रम सादर केले आहेत. लंडनची लेखीका तनुजा देसाई-हिडिएर ह्यांचे पुस्तक 'Born Confused' तसेच 'शाबास' ह्या पुस्तकांवरचे मनीषाचे कार्यक्रम वाखाणले गेले. 'शाबास' मधला 'बोस्टन' वरचा भाग मनीषाने स्वतः लिहीला आहे.

मनीषाने तिच्या गायन आणि वादनात भारतीय आणि मराठी संस्कृतीचा समन्वय साधला आहे. २००४ मध्ये झालेल्या Hindustani Musical Heritage कार्यक्रमात तिने 'ओ सजना बरखा बहार आयी (परख), जिथे सागरा धरणी मिळते (पुत्र व्हावा ऐसा), दिल चीज क्या है (उमराव जान), मामाच्या गावाला जाऊया (तु सुखी रहा) ही काही गाजलेली सदाबहार गीते म्हणून प्रेक्षकांची वाहवा मिळावली. मनीषाच्या गाण्यात आणि संगीतात वेस्टर्न आणि भारतीय मिलाफ आहे. पियानोवर तिच प्रेम आहे आणि आता ती तिच्या संगीतात 'तबल्याचा' वापर करते आहे. नुकताच तिचा 'Peace in Progress' हा अल्बम प्रसिध्द झाला आहे. जॅझ, क्लासिकल, वेस्टर्न आणि भारतीय संगीताचा समन्वय तिने घडवून आणला आहे. पंचेचाळीस मिनीटांच्या ह्या अल्बममध्ये मनीषाने स्वतः पियानो वाजवला आहे, गाणी लिहीली आहेत आणि सगळी स्वतः म्हटली आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे 'नाचरे मोरा', तसेच प्रा. अनंत भावे ह्यांची बालकविता 'पावसा पावसा' अशी मराठी गाणी व कविता सुध्दा अल्बम मध्ये समाविष्ट आहेत. 'श्यामरावची मुलगी' हे गीत मनीषाने मराठी व इंग्रजीत लिहीले आहे. अमेरिकेतल्या बऱ्याचश्या वृत्तपत्र, रेडिओ यांनी मनीषाच्या वैशिष्ट्यपूर्ण आवाजाची आणि संगीताची दखल घेतली आहे. Peace in Progress चे कार्यक्रम न्यु इंग्लंड, बोस्टन, न्युयॉर्क, वॉशिग्टन, साऊथ फ्लोरीडा, लॉसएन्जलिस आणि इस्रायल येथे झाले आहेत. Blind - The Remixes हा अल्बम 'सोनी इंडिया' कंपनीने बाजारात आणला आहे. ह्या अल्बम मध्ये मनीषाने वादन केले आहे.

मनीषाला सन्मानपूर्वक अतिथी म्हणून Brown University, Wellesley College, Brandeis University येथे बोलविण्यात आले होते. २००५ साली झालेल्या Women's जॅझ फेस्टिवल मध्ये (Drummer Allison Miller, Norah Jones, Sheila Jordan, Natalie Merchant)

बरोबर वाजवण्याची मनीषाला संधी मिळाली.

मनीषाची बरीचशी कारकीर्द न्यु इंग्लंड मध्ये आकाराला आली असली तरी मनीषा आता लॉसएन्जलिस येथे स्थित होणार आहे. मनीषाला प्रवासाची, पोहोण्याची, आणि स्वयंपाकाची आवड तर आहेच, पण www.manishamusic.com ह्या स्वतःच्या वेबसाईट व्दारा तिला जगभरातल्या आपल्या चाहत्यांशी संवाद साधायला अधिक आवडते.

मनीषाचे मराठी भाषेवर प्रेम आहे. अमेरिकेत तिला दोन - तीन वेळा रस्त्यावर सहजपणे जेंव्हा मराठी कानावर पडले तेव्हांचा आनंद अवर्णनीय होता. मनीषासाठी 'तबला' हा हृदयाचे स्पंदन आहे तर मराठी बोलणे आणि ऐकणे हे घरी परतण्यासारखे आहे. जेव्हा ती मराठी भाषिकांच्या चमू मध्ये असते तेव्हा तिच्याच भाषेत सांगायचे तर तिला 'साधं वरण-भात-तूप-लिंबूची' वाटी हातात आहे असे वाटते. लहानपणाची आठवण सांगतांना मनीषा म्हणते, "१९७० व ८० च्या दशकांमध्ये आम्ही राहात होतो तेथे मराठी माणूस दुर्मिळ होता. Martinsville, Virginia येथून माझे आई-बाबा एक तासाच्या अंतरावर असलेल्या Greensboro, North Carolina येथे जायचे. तेथे आम्हाला हिंदी, गुजराथी, तमीळ, पंजाबी आणि अत्यंत अल्प महाराष्ट्रीयन मंडळी भेटायची. तिथल्या ह्या काका-काकूंशी मी आवर्जून मराठीत बोलायचे. तसं मला हिंदी सुध्दा थोडे येते पण माझ्या हिंदी बोलण्यात सुध्दा मराठी वळण आहे."

माझा मराठीशी संपर्क सातत्याने न राहिल्याचे आणखीन एक कारण म्हणजे आमच्या परिवारात बंगाली, गुजराथी, तेलगू, तमीळ, अश्या विविध संस्कृतीशी विवाहबंध जुळले. त्यामुळे संवादासाठी सोयीचे म्हणून इंग्रजी अधिक बोलले जाते. माझ्या आईच्या माहेरी म्हणजे इंदूरला गेले असतांना सारे नातेवाईक मराठी पण हिंदीतून संवाद साधत होते. हे पाहून लहानपणी मला मजा वाटायची. 'language uproot' हा प्रकार भारतात राहून सुध्दा होतोच की, माझ्या परिवारात इतक्या संस्कृती आनंदाने नांदत असूनही मराठी मला जवळची आहे."

नव्या पिढीला संदेश देणे मनीषाला अवघड वाटते कारण भारतात नवीन पिढीत काय चालेले आहे यांची तिला कल्पना नाही. पण तिच्या मते वयात येतांना प्रत्येकालाच 'growing pains' असतात. महत्वाचे काय तर 'pains' कडे लक्ष न देता 'growing' कडे लक्ष देणे. मनीषा म्हणते " माझे त्यावेळेचे जगणे अधिक सुखकर झाले असते जर मला कळलं असते की 'pains' मुळे माझं 'grow' होणं अधिक व्यापक होणार आहे ".

मराठीवर्ल्डच्या वाचकांना संदेश देतांना म्हणते, " स्वतःची ओळख आणि संस्कृती जपणं महत्वाचे आहेच पण फक्त त्याचाच अट्टाहास नको. कधीतरी दुसऱ्याच्या आरशात आपल्याला वेगळे आणि स्पष्ट चित्र दिसते. आपल्याला कदाचित हे चित्र आवडणार नाही. त्यामुळे सांस्कृतीक वाद टाळण्यासाठी आपण दुसऱ्यांना आपल्यामध्ये सामावण्यात किंवा आपण दुसऱ्यामध्ये मिसळण्यात उत्सुक नसतो. माझ्या मते त्यामुळे आपण आपल्या चौफेर वाढीची संधी गमावून बसतो ".

मराठीवर्ल्ड.कॉम ही वेबसाईट इंटरनेटवर मराठीची संदर्भ सूची आहे."त्याचप्रमाणे मला माझ्या गायनाद्वारे दक्षिण आशियाई लोकांना समजवता येते की 'Indian' किंवा 'Hindu' ह्या भाषा नाहीत तसेच ' Hindi' एवढीच भाषा भारतात बोलली जात नाही तर माझी 'मराठी' भाषा भारतातल्या १८ प्रमुख भाषांपैकी एक आहे. मला ही संधी 'अमेरिकेत' पण मिळाली आणि आता तर 'इस्त्रायल' मध्ये सुध्दा! कार्यक्रमानंतर लोक आवर्जून मला कुठल्या भाषेत गाणं होतं? विचारतात आणि तिच्यात 'गोडवा' असल्याचही आवर्जून सांगतात. मराठीवर्ल्ड.कॉम सारखाच 'खारीचा वाटा' का असेना, पण मला वाटत वेस्टर्न म्युझीकमध्ये 'मराठी'चा समावेश करणं हे माझ वेगळेपण आहे. त्यामूळे मराठीचा आनंद जगभरातले श्रोते घेतात.

मनीषाचे आता 'Global Market' मध्ये येण्याचे स्वप्न आहे. मनीषाला स्वतःचे मार्केटींग स्वतःच करण्यावर विश्वास आहे. तिच्यामते आपले वैशिष्ट्य आपण स्वतःच सांगू शकतो. तरल आणि भावस्पर्शी गाणी लिहीणारी मनीषा तितकीच ठाम व आत्मविश्वासू आहे. तिला मराठी असण्याचा अभिमान तर आहेच पण वेस्टर्न संगीतावरही तितकेच प्रेम आहे. विश्वच जणू तिचे घर आहे आणि संगीत ही तिची भाषा! आजच्या युगाची ही तरुणी सहजपणे लिहून जाते :

Imagine if you could ride a train
to your troubles' very end;
Imagine if you could ride a train
that would take you back again to find the roots of where it all began

मुलाखत - भाग्यश्री केंगे
webmaster@marathiworld.com